मराठी साहित्य परिषद
तेलंगण राज्य, हैदराबाद


# पंचधारा

वर्ष ६९ वे, अंक पहिला

एप्रिल २०२६ ते जून २०२६
चैत्र ते ज्येष्ठ शके १९४८

## गोवा मुक्तिसंग्राम आणि साहित्य विशेषांक

Peer/Referee reviewed by UGC



मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : रु. १७५/-

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४ / ९२९३५०५०३९
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावेत.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. डॉ. शैलजा जोशी - ९२९३५०५०३९
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphyd@gmail. com

वार्षिक वर्गणी रु. ४००/- स्पीड पोस्ट सह रु. ६००/-
(एका वर्षातील सर्व अंक स्पीड पोस्टने हवे असल्यास एक वर्षाची वर्गणी)

BHIM UPI
SCAN & PAY

पंचधारा वर्गणी Marathi Sahitya Parishad
IDBI Bank, Sultan Bazar, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125
IFSC Code – IBKL0000594
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. १७५/-
टपाल खर्च : रु. ५०/-

अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, एरंडवणे, पुणे ४११००४.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................................ ५

प्रस्तावना ....................................... डॉ. चिन्मय मधू घैसास ........ ७

श्रद्धांजली : आसावरी काकडे .................. विद्या मक्तल .................... ९

- गोवा मुक्तिसंग्रामातील बंडांचे
  ऐतिहासिक विश्लेषण ....................... प्राप्ती महेंद्र गांवकर ............ ११
- गोवा मुक्ती आंदोलन
  (पुस्तकाच्या प्रस्तावनेतील काही अंश) ... कै. मधुकर महाजन ........... १८
- गोमंतक स्वातंत्र्यलढा :
  चिकित्सात्मक अवलोकन .................. डॉ. सीमा रिसबूड ............. २१
- नगरहवेलीचा चित्तथरारक मुक्तिसंग्राम..... डॉ. विद्या देवधर .............. २६
- स्वातंत्र्यसेनानी बाकीबाब.................... परेश वासुदेव प्रभू............. ३१
- गोवा मुक्तिसंग्रामातील वीरांगना :
  नेतृत्व आणि कर्तृत्व ........................ स्नेहा यशवंत देसाई........... ३९
- सतीचे वाण : एक ऐतिहासिक दस्तऐवज.. प्रा. विनायक ल. बापट ....... ४७
- गोवा मुक्तिसंग्रामाच्या ...................... रसिका केदार जोशी ........... ५५
  पार्श्वभूमीवरील आत्मचरित्रांचा.............. डॉ. चिन्मय मधू घैसास ...... ५५
  तुलनात्मक अभ्यास
- सुभाष भेण्डे यांच्या कादंबऱ्यांतील
  गोवा मुक्तिसंग्राम : एक अभ्यास .......... मानसी संजय शेट-मांद्रेकर ... ६०
- गोमंतकीय मराठी कथेतील
  गोवा मुक्तिसंग्रामाचे व तत्कालीन
  समाजवास्तवाचे चित्रण..................... डॉ. पूर्वा पंडित-वस्त ......... ६७
- १८ जून १९४६ आणि गोमंतकीय
  मराठी कादंबरी : एक अनुबंध ............. योगिता कालिदास चोडणकर . ७५

● पु. शि. नार्वेकर लिखित ‘विघ्नहर्ता’ कथासंग्रहातील पोर्तुगीजकालीन गोमंतकीय जीवन ........................... डॉ. भक्ती गोविंद महाजन .... ८४

● गोमंतकीय क्रांतीचे दर्शन घडवणारे ........ डॉ. चिन्मय मधू घैसास ...... ९०
ऐतिहासिक नाटक ‘शिवगोमंतक’ .......... प्रा. ओंकार गोवेकर

● मुक्तिपूर्व गोमंतकातील महत्त्वपूर्ण सामाजिक दस्तऐवज : राजाराम पैंगीणकर यांचे आत्मचरित्र ‘मी कोण?’ ............. हेमंत बाळकृष्ण अय्या ....... ९६

● गोवा मुक्तिसंग्रामात......................... प्रा. भास्कर सुखदेव ढोके .. १०८
मराठी साहित्यिकांचे योगदान :............ फणिंद्र रंगनाथ मंडलिक .... १०८
एक चिकित्सकीय अभ्यास

## ग्रंथपरीक्षणे

● सुबोध योगवासिष्ठ : संक्षिप्त मराठी अनुवाद ...................... आसावरी काकडे ........... ११५

● कविता आणि मानवतावाद (Poetry and Humanism)............. प्रा. स्वाती हरिभाऊ काटे ... ११९

● घुबड - भेट, निरीक्षण आणि संवर्धनाची गरज ........................... राजेश्वरी किशोर ............ १२४

## कार्यवृत्त

● संघर्ष सूक्त ते वैभव गाथा : मराठी महाविद्यालय माजी विद्यार्थी संमेलन ...................... डॉ. कांचन जतकर.......... १२९


● भावनेशी सूर जुळता ....................... अरुण डवलेकर ............ १३२

स्वागत नव्या पुस्तकांचे........................................................ १३४

लेखक परिचय ................................................................ १३५

# गोवा मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीवरील आत्मचरित्रांचा तुलनात्मक अभ्यास :

## 'आठवणी माझ्या कारावासांच्या काळ्या निळ्या पाण्याच्या' आणि 'अंधारातून प्रकाशाकडे'





रसिका केदार जोशी

डॉ. चिन्मय मधू घैसास

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेले, क्षेत्रफळानुसार सर्वांत लहान असलेले राज्य म्हणजे गोवा होय. निसर्गसंपदेने नटलेले व ऐतिहासिक वारसा लाभलेले असे हे गोवा राज्य. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास बहुआयामी आहे व त्यापैकी गोवा मुक्तिसंग्राम हा एक अत्यंत महत्त्वाचा, परंतु तुलनेने कमी चर्चिला गेलेला अध्याय आहे. पोर्तुगीजांनी जवळजवळ साडेचारशे वर्षे गोव्यावर राज्य केले. पोर्तुगीज सत्तेखालील गोव्यातील सामाजिक, राजकीय आणि मानवी परिस्थिती अत्यंत कठीण होती. गोवा मुक्तीसाठी कित्येक ज्ञात-अज्ञात वीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे. या परिस्थितीचा अनुभव ज्या व्यक्तींनी प्रत्यक्ष घेतला, त्यांच्या आत्मचरित्रांमधून त्या काळाचे वास्तव अत्यंत प्रभावीपणे समोर येते. 'आठवणी माझ्या कारावासांच्या काळ्या निळ्या पाण्याच्या' (पां. पु. शिरोडकर) आणि 'अंधारातून प्रकाशाकडे' (प्रभाकर सिनारी) ही दोन आत्मचरित्रे अशाच प्रकारची आहेत. ही आत्मचरित्रे केवळ वैयक्तिक जीवनकथा नसून ती गोवा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाची जिवंत साक्ष आहेत.

या दोन्ही आत्मचरित्रांमध्ये संघर्ष, कारावास, छळ, आशा आणि स्वातंत्र्याची तळमळ यांचे विविध पैलू उलगडलेले दिसतात. एकीकडे 'आठवणी माझ्या कारावासांच्या काळ्या निळ्या पाण्याच्या' हे आत्मचरित्र अधिक माहितीप्रधान आणि वस्तुनिष्ठ वाटते, तर दुसरीकडे 'अंधारातून प्रकाशाकडे' हे आत्मचरित्र अधिक अनुभवप्रधान आणि प्रेरणादायी आहे. तरीही या दोन्ही आत्मचरित्रांचा केंद्रबिंदू समान आहे आणि तो म्हणजे स्वातंत्र्यासाठी केलेला संघर्ष.

या संशोधनपर लेखात या दोन्ही आत्मचरित्रांचा एकत्रितपणे अभ्यास करून त्यांची रचना, कथानक, भाषाशैली, पात्रचित्रण आणि जीवनदृष्टी यांचा सखोल विचार करण्यात येणार आहे.

या दोन्ही आत्मचरित्रांची रचना पारंपरिक आत्मचरित्रांपेक्षा काही प्रमाणात वेगळी आहे. सामान्यतः आत्मचरित्राची सुरुवात बालपणापासून होते. मात्र, 'आठवणी माझ्या कारावासांच्या काळ्या निळ्या पाण्याच्या' या आत्मचरित्रात कथनाची सुरुवात थेट १९४२ सालापासून होते. यामुळे वाचकाला सुरुवातीपासूनच संघर्षाच्या वातावरणात प्रवेश मिळतो. 'अंधारातून प्रकाशाकडे' या आत्मचरित्रात बालपण, शिक्षण आणि पुढील जीवनप्रवास यांचा काही प्रमाणात कालानुक्रमिक आढावा दिलेला आहे. तसेच त्यांनी आपल्या घराण्याचा इतिहासदेखील या आत्मचरित्रात सांगितला आहे. त्यामुळे दुसरे आत्मचरित्र पारंपरिक रचनेच्या अधिक जवळ जाते.

दोन्ही आत्मचरित्रांमध्ये वैयक्तिक अनुभव आणि ऐतिहासिक घटना यांचा संगम दिसतो. मात्र, 'आठवणी...'मध्ये कारावास हा मुख्य केंद्रबिंदू आहे, तर 'अंधारातून प्रकाशाकडे'मध्ये संघर्ष, छळ, हल्ले व सर्वांत शेवटी मिळालेली मुक्ती हा प्रवास 'अंधारातून प्रकाशाकडे' या प्रतीकात्मकतेने मांडलेला आहे. दोन्ही ठिकाणी रचना कालानुक्रमिक असली तरी घटनांची निवड ही लेखकाच्या अनुभवांवर आधारित आहे.

गोव्याच्या राजकारणातील सुस्तपणा संपवून तिथे चैतन्याची लाट पसरवण्याचे नियतीने ठरवले आणि डॉ. राममनोहर लोहियांच्या रूपाने गोव्यात चैतन्य निर्माण झाले. तसे पाहिले तर डॉ. राममनोहर लोहिया म्हणजे भारतीय राजकारणातील चैतन्य होत![१] खरंतर डॉ. राममनोहर लोहिया यांच्या सत्याग्रहामुळेच पां. पु. शिरोडकर व प्रभाकर सिनारी यांना गोवा मुक्ती लढ्यात सहभाग घेण्याची प्रेरणा मिळाली.

गोव्यातील परिस्थितीमुळे शिरोडकर काही काळ मुंबईत 'नवशक्ती'मध्ये वृत्तसंपादक म्हणून कार्यरत होते आणि गोमंतकविषयक प्रगत संघटनांशी त्यांचा संबंध कायम होता. मात्र, जून १९४६मध्ये डॉ. राममनोहर लोहिया गोव्यात पोहोचल्याची आणि पोर्तुगीजांच्या नागरी स्वातंत्र्याविरोधी कायद्याविरुद्ध लढा उभारण्याची बातमी शिरोडकरांना कळली. ही बातमी त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरली. यानंतर १८ जून १९४६ रोजी डॉ. लोहिया यांनी सभाबंदी व भाषणबंदीचा आदेश मोडून सत्याग्रह केला आणि त्यांना अटक झाली. या घटनेने शिरोडकरांवर खोल परिणाम झाला. त्यांनी ही केवळ बातमी म्हणून न पाहता प्रत्यक्ष कृतीची गरज ओळखली. त्यामुळे त्यांनी 'नवशक्ती'मधील आपले पद सोडण्याचा निर्णय घेतला.

---

१. गोवा मुक्तिसंग्राम - वामन राधाकृष्ण (पान २८)

जरी डॉ. लोहिया यांनी त्यांना मुंबईत राहून प्रचारकार्य करण्याचा सल्ला दिला, तरी शिरोडकरांना प्रत्यक्ष मुक्ती लढ्यात सहभागी व्हायचे होते. त्यामुळे त्यांनी तो सल्ला नाकारून १५ ऑगस्ट १९४६ रोजी मुंबई सोडली आणि गोवा मुक्ती आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग घेण्याचा निर्णय घेतला.

त्याचप्रमाणे प्रभाकर सिनारी हे तेव्हा विद्यार्थी होते. १९ जून रोजी शाळेत त्यांना त्यांच्या शिक्षकांकडून या घटनेची सविस्तर माहिती मिळाली. शिक्षकांनी लोहियांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी विद्यार्थ्यांना मिरवणूक काढण्याचे आवाहन केले. सिनारीही या मिरवणुकीत सहभागी झाले. मात्र, या शांततापूर्ण आंदोलनावर पोलिसांनी अत्यंत क्रूरपणे हल्ला केला. विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली, शिक्षकांवर निर्दय अत्याचार झाले आणि हा सगळा प्रसंग सिनारी यांनी प्रत्यक्ष पाहिला. या अमानवी घटनेचा त्यांच्या बालमनावर खोल परिणाम झाला. या अनुभवामुळे सिनारी यांच्या मनात अन्यायाविरुद्ध तीव्र संताप आणि स्वातंत्र्याची जाणीव निर्माण झाली. डॉ. लोहिया यांच्या सत्याग्रहाने प्रेरणा मिळाली आणि स्वत: अनुभवलेल्या पोलिसी अत्याचारामुळे त्यांच्या मनात संघर्षाची भावना निर्माण झाली. त्यामुळे ते केवळ प्रेक्षक राहिले नाहीत, तर पुढे जाऊन गोवा मुक्तिसंग्रामात सक्रियपणे सहभागी होण्यास प्रवृत्त झाले. अशा प्रकारे लोहियांचे आगमन आणि त्यानंतर घडलेल्या घटनांनी प्रभाकर सिनारी यांच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडवून त्यांना मुक्ती लढ्याकडे वळवले.

दोन्ही आत्मचरित्रांचे कथानक गोवा मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीवर विकसित होते. 'आठवणी...'मध्ये कथानकाची सुरुवात १९४२पासून होते आणि लेखकाच्या तरुणपणातील राजकीय जागृतीपासून ते अंगोलातील कारावासापर्यंतचा प्रवास दाखवला आहे. गुप्त बैठका, पत्रके, क्रांतिकारक योजना आणि अटक या घटनांमुळे कथानकाला एक गंभीर आणि वास्तववादी स्वरूप प्राप्त होते.

याच्या तुलनेत 'अंधाराकडून प्रकाशाकडे' ह्या आत्मचरित्रात डॉ. राममनोहर लोहिया यांनी केलेल्या आंदोलनामुळे प्रेरणा घेऊन लेखक स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होतो व विद्यार्थी अवस्थेतच त्यांना पोलिसांच्या छळाचा अनुभव येतो.

दोन्ही आत्मचरित्रांमध्ये अटक आणि कारावास हे महत्त्वाचे घटक आहेत. 'आठवणी...'मध्ये लेखकाला तीन वेळा अटक होते व तिसऱ्यांदा झालेल्या अटकेत त्यांना अंगोला येथील पोर्तुगीजांच्या वसाहतीतील कारागृहात ठेवण्यात येते. अंगोलातील जीवन, तेथील कैद्यांची परिस्थिती आणि लेखकाची मानसिक अवस्था यांचे सविस्तर वर्णन केले आहे.

दुसरीकडे 'अंधारातून प्रकाशाकडे'मध्ये तुरुंगातील अमानुष छळ, अंधारकोठडी, पलायन आणि पुन्हा संघर्ष यांचे जिवंत चित्रण आहे. दादरा-नगरहवेली मुक्तीचा संघर्ष, सहकाऱ्यांचे बलिदान आणि शेवटी गोवा मुक्तीपर्यंतचा प्रवास यामुळे कथानक अधिक व्यापक आणि प्रेरणादायी बनते.

यामध्ये शिरोडकर हे 'नॅशनल काँग्रेस गोवा'चे प्रभारी सदस्य होते तर प्रभाकर सिनारी हे 'आझाद गोमंतक दला'तील सदस्य होते. त्यामुळे दोघांच्याही विचारसरणीत भेद आहे हे जाणवते.

दोन्ही आत्मचरित्रांची भाषा साधी आणि सरळ आहे. मात्र, त्यांच्या शैलीत सूक्ष्म फरक आढळतो. 'आठवणी...'मध्ये भाषा अधिक माहितीप्रधान आणि वस्तुनिष्ठ आहे. लेखक घटनांचे वर्णन थेट करतो आणि भावनिक रंगवणूक कमी ठेवतो. यामुळे हे आत्मचरित्र अधिक दस्तऐवजी स्वरूपाचे वाटते.

याउलट 'अंधारातून प्रकाशाकडे'मध्ये भाषा साधी व सोपी आहे. दोन्ही आत्मचरित्रांमध्ये कोंकणी व पोर्तुगीज भाषेचा देखील उपयोग केलेला दिसून येतो. या भाषेच्या वापरामुळे संवाद अधिक जिवंत वाटतात.

या दोन्ही आत्मचरित्रांमध्ये लेखकांनी आपल्या सहकाऱ्यांचे तसेच काही शिपाई किंवा पोलीस अधिकारी यांचे पात्रचित्रण केले आहे. पात्रचित्रण करीत असताना त्यांचा त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल असणारा आदर व अभिमान दिसून येतो, तसेच मॉन्तेरोसारख्या क्रूर पोर्तुगीज पोलीस अधिकाऱ्याचे वर्णन वाचताना वाचकाला चीड येते. परंतु प्रभाकर सिनारी त्यांच्याच 'आजाद गोमंतक दला'तील क्रांतिवीर मोहन रानडे यांच्याबद्दल रोखठोक मत मांडतात. सिनारी यांचे रानडे यांच्याविषयीचे मत वाचल्यास त्यांच्यातील परस्परसंबंध काहीसे ठीक नाहीत असे दिसून येते. थोडक्यात त्यांना असे वाटते की, सर्वांनीच रानडे यांचे गरजेपेक्षा जास्त उदात्तीकरण केले आहे. त्यांना झालेल्या तुरुंगवासात त्यांना पुष्कळ कष्ट काढावे लागले हे त्यांना मान्य आहे. परंतु सिनारी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्याहूनही जास्त कष्ट केलेले कित्येक स्वातंत्र्यसैनिक आहेत ज्यांची नोंद घेणे आवश्यक आहे.

दोन्ही आत्मचरित्रांमध्ये आत्मकेंद्रीपणा असला तरी तो मर्यादित आहे. लेखक स्वतःच्या अनुभवांवर आधारित कथन करतात, परंतु त्यामध्ये सहकाऱ्यांचा आणि समाजाचा सहभागही दिसतो. त्यामुळे 'मी' हळूहळू 'आपण'मध्ये परिवर्तित होतो. सत्यकथनाच्या दृष्टीने दोन्ही आत्मचरित्रे अत्यंत प्रामाणिक आहेत. लेखकांनी स्वतःचे गौरवगान केलेले नाही; उलट अपयश, त्रुटी आणि मर्यादा यांचाही स्वीकार केला आहे.

दोन्ही आत्मचरित्रांचा मुख्य हेतू म्हणजे त्या काळातील संघर्ष आणि अनुभव जतन करणे हा आहे. त्याचबरोबर पुढील पिढीला प्रेरणा देणे आणि स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून देणे हा उद्देशही स्पष्ट दिसतो.

एकत्रितपणे पाहता 'आठवणी माझ्या कारावासांच्या काळ्या निळ्या पाण्याच्या' आणि 'अंधारातून प्रकाशाकडे' ही आत्मचरित्रे गोवा मुक्तिसंग्रामाचे दोन वेगवेगळे पण परस्परपूरक पैलू उलगडतात. तरीही दोन्हींचा केंद्रबिंदू समान आहे व तो म्हणजे स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष आणि त्यासाठी दिलेले बलिदान.

या आत्मचरित्रांमधून गोवा मुक्तिसंग्रामाचे वास्तव, पोर्तुगीज सत्तेची क्रूरता, स्वातंत्र्यसैनिकांची जिद्द आणि सामूहिकतेची ताकद यांचे प्रभावी चित्रण होते. ही आत्मचरित्रे केवळ साहित्यिक दृष्टीकोनातून महत्त्वाची नसून ती ऐतिहासिकदृष्ट्याही अमूल्य आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**


१) अंधारातून प्रकाशाकडे - प्रभाकर सिनारी

२) आठवणी माझ्या कारावासाच्या काळ्या निळ्या पाण्यांच्या - पां. पु. शिरोडकर

३) गोवा मुक्तिसंग्राम - वामन राधाकृष्ण


■





**पंचधारा**

**मराठी साहित्य प्रकार**

**जानेवारी २०२४ – मार्च २०२४**
**आश्विन ते फाल्गुन १९४५**

या अंकात ग्रामीण कादंबरी, पोवारी भाषा विषयक वृत्तपत्र, वैचारिक साहित्य, पत्रकार, बालसाहित्य, विंदांच्या कविता, आधुनिक महाराष्ट्राची जडण घडण, गुजरते हुए - डॉ. सादिक यांचे जीवन चरित्र असे अभ्यासपूर्ण लेख तसेच ग्रंथ परीक्षणे आणि कार्यवृत्त यांचा समावेश आहे.